पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक – १६/०४/२०२१ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १६/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती
२. मा.सुजाता सुनिल पालांडे
३. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे – सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०५/०४/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) थेरगांव हॉस्पिटल येथील कोवीड-१९ करिता विद्युत व्यवस्थेचे चालन देखभाल दुरुस्ती व अनुषंगिक कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.२) जिजामाता हॉस्पिटल येथील कोवीड-१९ करिता विद्युत व्यवस्थेचे चालन देखभाल दुरुस्ती व अनुषंगिक कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.३) कोविड केअर सेंटर जिजामाता हॉस्पिटल पिंपरी आणि थेरगाव हॉस्पिटल येथे ऑक्सिजन प्लान्टकरीता ६० केव्हीएचा युपीएस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.४) कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तात्पुरत्या स्वरुपात विद्युत व्यवस्था करणे व अनुषंगिक कामे करणे या कामाचे वाढीव र.रु.४९,९४,२३३/- ला प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १६/०४/२०२१ विभाग – ग क्षेत्रीय विद्युत
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सुलक्षणा धर
संदर्भ : मा.अति.आयुक्त (१) यांचेकडील पत्र क्र.वि/गक्षेका/४४२/२०२१ दि.१५/०४/२०२१.

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

थेरगाव हॉस्पीटल येथील कोवीड-१९ करिता विद्युत व्यवस्थेचे चालन देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रू.२४,९८,७०७/- (अक्षरी र.रु.चोवीस लाख अठ्ठयाण्णव हजार सातशे सात फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. थेरगाव हॉस्पीटल येथे कोवीड-१९ करिता १०० बेडचे हॉस्पीटल तयार करणेचे नियोजन आहे. सदर ठिकाणी तीन शिफ्टमध्ये तांत्रिक कर्मचारी नेमणे, इतर विद्युतविषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाचा खर्च भांडार विभागाकडील कोवीड-१९ या लेखाशीर्षातून करणेत येणार आहे. सदर कामास र.रू.२४,९८,७०७/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ०२
दिनांक - १६/०४/२०२१ विभाग – ग क्षेत्रीय विद्युत
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सुलक्षणा धर
संदर्भ : मा.अति.आयुक्त (१) यांचेकडील पत्र क्र.वि/गक्षेका/४४१/२०२१ दि.१५/०४/२०२१.

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

जिजामाता हॉस्पीटल येथील कोवीड-१० करिता विद्युत व्यवस्थेचे चालन देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रू.२४,९८,७०७/- (अक्षरी र.रु.चोवीस लाख अठ्ठयाण्णव हजार सातशे सात फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. जिजामाता हॉस्पीटल हे कोवीड-19 करिता तयार केलेले आहे. सदर ठिकाणी 100 बेडची कोवीड-१९ करिता व्यवस्था करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी तीन शिफ्टमध्ये तांत्रिक कर्मचारी नेमणे, इतर विद्युतविषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे इ. कामाचा समावेश करणेत आलेला आहे. सदर कामाचा खर्च भांडार विभागाकडील कोवीड-१९ या लेखाशीर्षातून करणेत येणार आहे. सदर कामास र.रू.२४,९८,७०७/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ०३
दिनांक - १६/०४/२०२१ विभाग – ग क्षेत्रीय विद्युत
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सुलक्षणा धर
संदर्भ : मा.अति.आयुक्त (१) यांचेकडील पत्र क्र.वि/गक्षेका/४४३/२०२१ दि.१६/०४/२०२१.

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

जिजामाता हॉस्पीटल पिंपरी येथे १०० बेडचे कोवीड केअर हॉस्पिटल सुरू आहे आणि थेरगाव हॉस्पिटल येथे १०० बेडचे कोवीड केअर सेन्टर तयार करणेचे नियोजन आहे. सदर

ठिकाणी ऑक्सिजन प्लान्ट बसविणेचे काम सुरू आहे. ऑक्सिजन प्लान्टकरिता ६० केव्हीएचा युपीएस बसविणे आवश्यक आहे. वीजपुरवठा खंडीत झालेनंतर जनित्र संचावर वीजभार शिफ्ट होईपर्यंत ३-४ मिनीटे कालावधी लागतो तथापि सदर ऑक्सिजन प्लान्ट २४ तास कार्यरत ठेवणे अत्यावश्क आहे. त्याकरिता ऑक्सिजन प्लान्टसाठी ६० केव्हीएचा युपीएस बसविणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत ग क्षेत्रीय कार्यालयाकडे युपीएस बसविणेचे काम सुरु नाही त्यामुळे लघुमुदतीची निविदा काढून सदरचे काम करणे आवश्यक आहे. सदर कामाचे मंजूर दरपृथ्थकरणानुसार अंदाजपत्रक तयार केले असता र.रु.२४,५८,९२२/- (अक्षरी र.रु.चोविस लाख अठ्ठावण्ण हजार नऊशे बावीस फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च भांडार विभागाकडील कोविड निधी या लेखाशिर्षातून करणेस मान्यता तसेच विषयांकित कामास र.रु.२४,५८,९२२/- ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १६/०४/२०२१ विभाग – ड क्षेत्रीय विद्युत

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : **मा.अति.आयुक्त (१) यांचेकडील पत्र क्र.वि/डक्षेका/१/कावि/१८५/२०२१ दि.०७/०४/२०२१.**

मा.अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

राज्यशासनाने आपत्ती व्यावस्थापण कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यावस्थापण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यातील वाचले क्र.१५ अन्वये मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यानी शहरा मध्ये कोविड पॉझिटिव्ह रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने अशा रूग्णावर तातडीने उपचार करणे व विलगीकरणात ठेवणे अत्यावश्यक असल्याचे कळविले आहे. त्यानुसार त्यांनी बालेवाडी क्रिडा संकुल येथील वसतीगृह इमारती तात्काळ ताब्यात मिळणे बाबत विनंती केली होती. त्या अनुषंघाने चिंचवड महानगरपालिका यांना संस्थेचे वसतीगृह इमारत क्र. B,D-2 तसेच बॅडमिटन हॉल अधीग्रहण करण्याचे आदेश जा.क्र. फौज/कोरोना/कावि/६३/ २०२१ दि.०१/०४/२०२१ अन्वये निर्गत करणेत आलेले आहेत. त्यास अनुसरून मा.प्र. आयुक्त क्रिडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य यांनी सदर ठिकाणी अत्यावश्यक कामे तातडीने करणे बाबत विनंती केलेली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर ठिकाणी विद्युत विषयक कामे तातडीने करणे गरजेचे आहे. सदर ठिकाणी दि.०५/०४/२०२१ रोजी मा.सहशहर अभियंता (वि/यां) तसेच मा.श्री.भालकर साहेब सहशहर अभियंता (स्था) यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर ठिकाणी पुढील ४ महीने कालावधी करीता कर्मचारी नेमणे व इतर विद्युत विषयक कामे करणे करीता र.रू.२०,१८,२९१/- (अक्षरी र.रु.वीस लाख अठरा हजार दोनशे एक्याण्णव फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर विद्युत विषयक कामे करणे करीता सध्या या विभागाकडे चालु असलेल्या कोरोना विषाणुचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे करीता ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था करणे व अनुषंगिक कामे करणे या कामात वाढीव खर्चास मान्यता घेवुन करणे शक्य आहे. सदरच्या कामाचे आदेश एजन्सी मे.कमल इलेक्ट्रीक एंटरप्रायझेस यांना दि.२८/०९/२०२० रोजी र.रू.२६,५७,०९०/- चे देण्यात आले आहेत.

सदरच्या कामाचा निविदा स्विकृत दर ५.५% कमी आहे. त्यापैकी आत्तापर्यंत प्रत्यक्ष र.रू.२५,७४,१२०/- GST सह खर्च झालेला आहे. सदरच्या कामाचे अंतिम देयक एजन्सीला अदा करणे अद्याप बाकी आहे. उपरोक्त नमूद प्रमाणे बालेवाडी येथे कोविड केअर सेंटर तयार करणेकामी तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी नेमणूक करणे तसेच आवश्यक विद्युत विषयक कामे करणेकामी र.रू.२०,१८,२९१/- इतका खर्च GST सह अपेक्षित आहे. सदरच्या कामाचा वाढीव खर्च र.रू.२०,१८,२९१/- सुधारित खर्च र.रू.४९,९४,२३३/- यांस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२०२/२०२१
दिनांक : १६/०४/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.